जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

अदालत रोड, औरंगाबाद ४३१ ००१.

निविदा सुचना

जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद व तद्अंतर्गत असलेल्या सर्व न्यायालयाच्या आस्थापनवेरील अनुज्ञेय बेलिफ कर्मचारी यांना दैनंदिन कामकाजाकरीता चांगल्या दर्जाचे रेनकोट व बॅग (गोपनीय कागदपत्रे हाताळणेकरीता) खरेदी करण्यासाठी स्थानिक बाजारपेठेतुन मोहरबंद निविदा/दरपत्रके दिनांक १८/०८/२०२५ ते २१/०८/२०२५ या कालावधीत मागविण्यात येत आहेत.

मोहरबंद निविदा/दरपत्रके सोबत रेनकोट व बॅग चा नमुना दिनांक २१/०८/२०२५ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रकांचा या प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरुन

18.8.२०२५

उ.प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय

औरंगाबाद

दिनांक : १८/०८/२०२५

टिप :—

०१. निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सादर करतांना त्यावर GST/SGST क्रमांक नमुद असलेले तथापी, GST/SGST क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.

०२. निविदाकारांनी निविदा/दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.

०३. प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा/दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.

०४. खरेदी प्राधिका—या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि ईच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना हमीपत्र सादर करावे लागेल.